महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा माळा, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

## तातडीचे निवेदन

**संदर्भ :** **आम आदमी पक्षाने दिनांक २० फेब्रुवारी २०१४ रोजी महाजनको का महापावर घोटाला या शीषर्काखाली महानिर्मितीवर केलेले आरोप**

---

उपरोक्त संदर्भानुसार महानिर्मितीतर्फे नमूद करण्यात येते की, वरील सर्व आरोप निराधार व संपूर्णत: चुकीचे, विपर्यस्त व राजकीय हेतूने प्रेरित आहेत. आरोपकर्त्यांनी केवळ सनसनाटी आरोप करण्यासाठी व प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधून घेण्यासाठी चुकीच्या माहितीवर आधारित चुकीची आकडेवारी सादर केलेली आहे. त्याबाबतची प्रत्यक्ष वस्तुस्थिती खालीलप्रमाणे :

- देशी कोळसा प्राप्त होण्यासंदर्भात महाजनकोने कोळसा कंपन्यांशी केलेल्या कोळसा पुरवठा करारानुसार कोळसा खाणींपासून वीजकेंद्रांपर्यंत **कोळशाचा पुरवठा करण्याची जबाबदारी महानिर्मितीची नसून चारही कोळसा कंपन्यांचीच आहे.** त्यामुळे महानिर्मितीने कोळशाची उचल केलेली नाही, हा आरोप पूर्णत: चुकीचा आहे.
  तसेच कोळसा कंपन्यांनी पुरवठा करारानुसार (Agreement) निर्धारीत दर्जाचा कोळसा पुरवठा करणे बाध्य आहे. परंतु, त्यानुसार निर्धारित प्रमाणात कोळसा प्राप्त होत नाही. **प्राप्त होणाऱ्या कोळशाचे प्रमाण जेमतेम ७०% इतकेच असून तेवढ्या प्रमाणातच महानिर्मितीने मे. कोल इंडिया लि. या शासकीय उपक्रमाला खरेदीपोटीचे पैसे दिलेले आहेत.**
- गेल्या काही वर्षांपासून अनेक नवीन औष्णिक संचांची उभारणी झाल्याने संपूर्ण देशात कोळशाची मागणी वाढलेली आहे. तथापि, तुलनेने त्या प्रमाणात कोळशाचा पुरवठा न वाढल्याने देशात सर्वत्र देशी कोळशाचा तुटवडा दिसून येतो. वस्तुत: देशांतर्गत कोळसा उत्पादन व पुरवठा यातील तफावत भरुन काढण्यासाठीच केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने (CEA) आयातीत कोळसा खरेदीचे निर्देश एन.टी.पी.सी. सहित सर्व वीजकंपन्यांना दिलेले आहेत व यासाठीचे प्रमाणदेखील सदर प्राधिकरणाने निर्धारित केलेले आहे. महानिर्मितीतर्फे मात्र एकूण आवश्यक असलेल्या कोळशाच्या मात्रेपैकी जेमतेम ८ ते १०% एवढाच कोळसा आयात करण्यात येतो व हे प्रमाण प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या प्रमाणापेक्षा देखील कमी आहे. महानिर्मिती, प्राप्त देशी कोळशाचा उष्मांक, विद्युत निर्मिती, व्यापक जनहित व ग्राहक हित या गोष्टींचा सारासार विचार करुन आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक निविदांमार्फत पारदर्शक पध्दतीने आंतरराष्ट्रीय निर्देशांकानुसार आयात कोळसा खरेदी करते.
- कोळसा टंचाईमुळे गेल्या वर्षी भारांकाची राष्ट्रीय सरासरी घटून सुमारे ६९% इतकी झालेली आहे. वर्ष २०१२-१३ मध्ये महानिर्मितीने कोळसा टंचाईच्या विपरीत परिस्थितीत सुमारे ६८% इतका भारांक (PLF) साध्य केला. कोळसा समस्या असूनही महानिर्मितीचा भारांक राष्ट्रीय सरासरीच्या जवळपास आहे. प्रत्यक्षात प्राप्त झालेल्या कोळशाच्या प्रमाणानुसारची वीजनिर्मिती गृहीत धरल्यास महानिर्मितीचा २०१२-१३ साठीचा हा भारांक (PLF) हा सुमारे ८४% इतका आहे.
- महानिर्मितीने गेल्या वर्षात कार्यान्वित झालेल्या २५०० मेगावॅटच्या प्रकल्पाद्वारे जानेवारी २०१४ पर्यंत **एकूण २८,७२९ दशलक्ष युनिटस् इतकी वीजनिर्मिती साध्य झाली असून** त्यापोटी रु. १२,५५७ कोटी महसूल देखील प्राप्त झाला आहे. हे सर्व प्रकल्प उभारत असताना प्रकल्पासाठी महानिर्मितीने केलेला खर्च हा केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने (CERC) निर्धारित केलेल्या निकषापेक्षा कमी आहे. त्यामुळे प्रकल्प उभारणीत रु. दहा हजार कोटी खर्च होऊन भ्रष्टाचार झालेला आहे, हा आरोप पूर्णत: चुकीचा आहे. महानिर्मितीच्या या सर्व प्रकल्पांवर झालेल्या खर्चाचे कॅग या संस्थेतर्फे अंकेक्षण (CAG Audit) देखील झालेले असून सदर भांडवली खर्चास महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने मंजूरी दिलेली आहे.

**********